# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ०१ फेब्रुवारी २०१६

## ज्येष्ठ पत्रकार आणि विचारवंत डॉ.अरुण टिकेकर यांच्या स्मृतींना उजाळा

मुंबई - मुंबई विद्यापीठाचे माजी विद्यार्थी, मुंबई विद्यापीठाचे इतिहासकार आणि समाजचिंतक डॉ. अरूण टिकेकर यांची आदरांजली सभा मुंबई विद्यापीठात होणं, हे औचित्यपूर्ण आहे.विद्यापीठाशी असलेलं त्यांचं नातं इतकं जवळकीचं होत गेलं की पुढे त्यांच्याकडे मुंबई विद्यापीठाचा इतिहास लिहिण्याचं काम सोपवण्यात आलं, ही गोष्ट अत्यंत नैसर्गिक आणि स्वाभाविक ठरली, यात आश्चर्य नाही. विद्यापीठाचा इतिहास लिहिण्यापूर्वी जवळपास २२ वर्षं त्यांचा विद्यापीठाच्या या परिसराशी आणि राजाबाई टॉवर ग्रंथालयाशी अगदी रोजचा संबंध होता. त्यामुळे या विद्यापीठाबद्दलची एक सखोल आत्मीयतेची भावना त्यांच्या ठिकाणी होती. त्याचंच प्रतिबिंब त्यांच्या इतिहास- लेखनात आपल्याला दिसत असल्याचे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी केले. ज्येष्ठ पत्रकार आणि विचारवंत डॉ.अरुण टिकेकर यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आज मुंबई विद्यापीठाच्या ऐतिहासिक दीक्षांत सभागृहात आदरांजली सभा आयोजित करण्यात आली होती.त्यावेळी डॉ.संजय देशमुख यांनी डॉ.टिकेकरांच्या आठवणींना उजाळा देत डॉ. अरुण टिकेकरांच्या निधनामुळे तत्वनिष्ठ आणि ज्ञानी व्यक्तीमत्व हरपले असल्याची भावना व्यक्त केली.पुढे ते म्हणाले की, एखादी संस्था आणि तिचं कार्य हा सामाजिक दस्तऐवज असतो याचं पूर्ण भान या इतिहासलेखनात टिकेकरांनी ठेवलेलं दिसतं. त्यामुळेच हा इतिहास विद्यापीठाचा जसा आहे; तसाच तो या मुंबई शहराचा, इथल्या शैक्षणिक प्रगतीचा आणि समाज- संस्कृतीतील बदलांचाही इतिहास आहे. टिकेकरांच्या ग्रंथदातृत्वाचा उल्लेख करताना डॉ. संजय देशमुख म्हणाले की, मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयाला टिकेकरांनी स्वत:कडील अत्यंत दुर्मिळ आणि मौल्यवान अशी १७ हजार ग्रंथांची देणगी दिली. या देणगीमुळे हे ग्रंथालय अधिक समृद्ध झालं, यात शंका नाही.

आज टिकेकरांचा विचार करताना मला एका गोष्टीकडे लक्ष वेधावंसं वाटतं आणि ती म्हणजे, १९८४ नंतर महाराष्ट्राच्या अत्यंत वेगाने बदलणाऱ्या सामाजिक- राजकीय- सांस्कृतिक स्थितीचा आणि त्यांच्या परिणामांचा त्यांनी घेतलेला अभ्यासपूर्ण, संशोधनपूर्ण, मर्मस्पर्शी वेध! या काळातील जागतिक बदल, राष्ट्रीय पातळीवरचे बदल यांचा एक व्यापक शोध आणि चिंतन टिकेकरांनी आपल्यासमोर मांडलं आहे. या कालावधीत भारताने अनेक क्षेत्रात जागतिक पातळीवर आघाडी घेतली; आर्थिक महासत्ता आणि ज्ञानाची महासत्ता म्हणून भारत उभा राहील असं म्हटलं जाऊ लागलं; आंतरराष्ट्रीय राजकारणातलं भारताचं स्थान बदललं. पण या सर्व बदलांच्या बरोबरीने आपल्याकडे दिसून आलेला मूल्यांचा ऱ्हास आणि सामाजिक विचारविन्मुखता याच्यावर टिकेकर सतत लिहित राहिले, त्यामुळेच समाजबदलांचा आणि सांस्कृतिक बदलांचा इतिहासकार म्हणून मी टिकेकरांकडे पाहतोटिकेकरांचा

आदर्श असलेले न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे म्हणजे महाराष्ट्राचा विचारपुरुष! त्यांनी रुजवलेली विवेकवादी विचारसरणी टिकेकरांनी मनोमन जपली आणि जोपासली होती. Humanize, Equalize, Spiritualise हा मंत्र रानडेंनी समाजाला दिला; त्याचं यथायोग्य पालन टिकेकरांनी आपल्या सर्वच लेखनातून केलेलं मला दिसतं. समाजाच्या विवेकाला आवाहन करणारे आणि समाजाला कृतीप्रवण करू पाहणारे टिकेकर हे आजच्या काळातले अव्वल दर्जाचे समाजचिंतक असल्याचेही त्यांनी सांगितले.पुढे ते म्हणाले की, डॉ. टिकेकर उच्च शिक्षणाच्या आणि संशोधनाच्या बाबतीत ज्या दर्जात्मक बदलांची वेळोवेळी अपेक्षा करत होते आणि आंतरशाखीय, आंतराष्ट्रीय अभ्यासाच्या ज्या दिशांची त्यांना तातडीची गरज वाटत होती, त्या दिशेने आता विद्यापीठ जोमाने वाटचाल करणार असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला.शहराचे जीवन, शहराचा इतिहास आणि शहराची विवेकशीलता यातील जशा प्रकारच्या परस्परसंबंधांची त्यांची कल्पना होती, ती प्रत्यक्षात आणण्यासाठी हे विद्यापीठ सर्व प्रकारे प्रयत्न करेल ही मी माझी आणि विद्यापीठाची बांधिलकी समजत असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ.अरुण टिकेकरांच्या स्मृतींना उजाळा देत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या त्यांच्या सानिध्यात वाढतांना त्यांना आलेल्या अनुभवांचे कथन केले.यामध्ये प्रामुख्याने प्रा.जे.व्ही.नाईक यांनी डॉ.टिकेकरांशी असलेले सह्रदयाचे संबंध व एका मित्रत्वाच्या संबंधातून निर्माण झालेले भावबंधाना उजाळा दिला.ज्येष्ठ पत्रकार आणि लोकमत वृत्तपत्राचे समूह संपादक दिनकर रायकर यांनी डॉ.टिकेकरांकडून मिळालेले अमूल्य मार्गदर्शन आणि १९९१ पासूनचे असलेले पत्रकारीतल्या  संबंधाचा उहापोह केला.माधव शिरवळकर यांनी डॉ.अरुण टिकेकरांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील अनेक किस्से सांगून टिकेकरांची निष्पक्ष पत्रकारीता भावी पीढीसाठी कशी मार्गदर्शक ठरत आहे याचे उदाहरण दिले. तर लोकसत्ताचे सीईओ जॉर्ज वर्गीस यांनी डॉ.अरुण टिकेकरांचे लोकसत्ता या वृत्तपत्रातील योगदान अधोरेखित केले. तर लोकसत्ता वृत्तपत्रातील संपादक तुमच्या भेटीला या आगळ्या वेगळ्या उपक्रमाला पत्रकार जंयत धुळप यांनी उजाळा दिला.तर १२० हून अधिक लोकांना लिहते करण्याचे सामर्थ्य ज्या संपादकाला लाभले असे संपादक म्हणून डॉ.टिकेररांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल असे आनंद लिमये यांनी सांगितले.डॉ.टिकेकरांच्या अकाली निधनामुळे वैचारिक क्षेत्रातील विवेकवादी विचार कमी झाल्याची खंत विजय कुवळेकर यांनी केली.डॉ.टिकेकर हे तत्वे आचरणात आणणारे व्यक्तीमत्व असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.टिकेकरांच्या बरोबर काम केलेल्या शुभदा चौकर यांनी डॉ.अरुण टिकेकरांचा लोकसत्ता वृत्तपत्राकडे बघण्याचा संस्थात्मक दृष्टिकोन ,त्यांची बांधिलकी त्यांची एकनिष्ठता यावर प्रकाश टाकत डॉ.अरुण टिकेकरांचे विचार आणि मुल्य आचरणात आणली गेली पाहिजेत असे आग्रहाने नमुद केले.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)